■ वर्ष- १२ ■ अंक- ०७ ■ मुंबई, मंगळवार,३० डिसेंबर २०२५ ते ५ जानेवारी २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

छातीतील जळजळीमुळे त्रस्त आहात? मग हे करून बघा

3 → तेव्हा कुठे जातो स्त्री सन्मान?

५ रुपयांत मनसोक्त जेवणाची थाळी अटल कॅन्टीनची देशभरात चर्चा ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

महापौरपदासाठी लॉटरी?

आरक्षणाची माळ कोणत्या प्रवर्गाच्या गळ्यात पडणार?

प्रक्रिया आठवडाभरात पूर्ण होणार

मुंबई ,मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची धामधूम सुरू झाली असून, यावेळी महापौरपदाची लॉटरी नेमकी कुणाला लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यंदा महापौरपदासाठी चक्रानुक्रम पद्धतीने नव्हे, तर नव्याने लॉटरी काढण्यात येणार असून ती प्रक्रिया आठवडाभरात पूर्ण होणार असल्याची माहिती महापालिकेच्या निवडणूक विभागातील सूत्रांनी दिली.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगरपालिकेचे महापौरपद हे सर्वोच्च मानले जाते. या पदावर विराजमान होण्यासाठी प्रत्येक नगरसेवक उत्सुक असतो. मात्र आरक्षणामुळे अनेकांना ही संधी मिळत नाही. १९९८ पासूनच्या महापौर आरक्षणाचा आढावा घेतल्यास, खुल्या प्रवगार्तील नगरसेवकांना पाच वेळा महापौरपदाची संधी मिळाली आहे. २०१७ आणि २०२० या दोन्ही वेळा महापौरपद खुल्या प्रवगार्साठी आरक्षित असतानाही शिवसेनेने खुल्या प्रवगार्तील नगरसेवकांना संधी दिली नाही.

२०१७ मध्ये दिवंगत विश्वनाथ महाडेश्वर आणि २०२० मध्ये किशोरी पेडणेकर हे दोघेही ओबीसी प्रवगार्तून महापौर झाले. २०२० मध्ये खुला प्रवर्ग असतानाही महिला ओबीसी असलेल्या किशोरी पेडणेकर यांची निवड झाल्याने खुल्या प्रवगार्तील नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटला होता. आतापर्यंत महापौरपदाची लॉटरी चक्रानुक्रमानुसार काढली जात होती. मात्र यावेळी प्रभाग आरक्षणाच्या धर्तीवर नव्याने आरक्षण काढण्यात येणार आहे. त्यामुळे महापौरपद नेमके कोणत्या प्रवर्गात जाणार, याचा अंदाज बांधणे सध्या कठीण असल्याचे पालिकेच्या निवडणूक विभागाचे म्हणणे आहे.

नव्या लॉटरीमुळे राजकीय पक्षांची धाकधूक वाढली असून, इच्छुकांची गणितेही बदलण्याची शक्यता आहे. मुंबई वगळता अन्य २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. मुंबई पालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये प्रत्येक प्रभागात चार जागा असतील.

महापौरपदाचे आरक्षण

१९९८ : नंदू साटम (ओबीसी)
१९९९ : हरेश्वर पाटील (सर्वसाधारण)
२००२ : महादेव देवळे (एससी)
२००४ : दत्ता दळवी (सर्वसाधारण)
२००७ : डॉ. शुभा राऊत (ओबीसी महिला)
२००९ : श्रद्धा जाधव (सर्वसाधारण महिला)
२०१२ : सुनील प्रभू (सर्वसाधारण)
२०१४ : स्नेहल आंबेकर (एससी महिला)
२०१७ : विश्वनाथ महाडेश्वर (ओबीसी)
२०२० : किशोरी पेडणेकर (ओबीसी)



वागळे इस्टेट डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र हटवा, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने राज्य सरकार, ठाणे महापालिकेसह सर्व प्रतिवादींना नोटीस जारी केली आहे.

उत्तर भारतीयांना आकर्षित करण्यासाठी पक्षांची चढाओढ

मुंबई। आगामी महापालिका निवडणुकीत उत्तर भारतीय मतदारांचा कौल निर्णायक ठरणार असल्याने शहरातील सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी आपली रणनीती या मतदारांभोवती केंद्रित केली आहे. एकूण मतदारसंख्येच्या अंदाजे १५ ते २५ टक्के असलेल्या या समुदायाचे संख्याबळ उत्तर आणि पूर्व उपनगरांतील अनेक प्रभागांत निकालाची दिशा ठरवण्यासाठी कारणीभूत ठरू शकतात. भाजपकडून उत्तर भारतीय मतदारांशी पारंपरिक संबंध अधिक बळकट करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक उत्सव आणि स्थानिक संपर्क मोहिमांवर भर दिला जात आहे. ठाकरे सेना सर्वसमावेशक राजकारणाचा संदेश देत उत्तर भारतीय मतदारांशी संवाद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे तर काँग्रेसने मुस्लिम, दलित, उत्तर भारतीय मतदारांना केंद्रस्थानी ठेवत स्वतंत्र रणनीती आखली आहे.

वागळे इस्टेटमधील डम्पिंग ग्राऊंडप्रकरणी जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने घेतली दखल

३ आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश

मुंबई। स्मार्ट सिटी म्हणून उदयास येत असलेल्या ठाणे शहराला दुर्गंधीपासून वाचवा. वागळे इस्टेट डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र हटवा, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने राज्य सरकार, ठाणे महापालिकेसह सर्व प्रतिवादींना नोटीस जारी केली आहे. तीन आठवड्यात याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश देत याचिकेची सुनावणी तहकूब ठेवली. ठाणे वागळे इस्टेटमधील डम्पिंग मुद्द्यावर स्थानिक पर्यावरण कार्यकर्ते रामेश्वर बचाटे यांच्यावतीने ॲड. विकास तांबवेकर आणि ॲड. संध्या म्हसकर ॲड. बाबासाहेब चकवे, सचिन कांबळे ॲड. यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी ॲड. विकास तांबवेकर यांनी वागळे इस्टेट डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याचे मोठे डोंगर उभे राहिले आहेत. त्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. त्यामुळे दुर्गंधी पसरून ठाणेकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे, याकडे मुंबई उच्च न्यायालयाचे लक्ष वेधले. त्याची न्यायालयाने दखल घेतली.



वागळे इस्टेट डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र हटवा, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने राज्य सरकार, ठाणे महापालिकेसह सर्व प्रतिवादींना नोटीस जारी केली आहे.

राज्य सरकार, ठामपाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

या संदर्भात राज्य सरकारसह संबंधित विभागाला वेळोवेळी निवेदने दिली आहेत. त्यानंतरही कचऱ्याचा प्रश्न 'जैसे थे' ठेवून पर्यावरण नियम धाब्यावर बसवण्यात आले आहेत. या प्रकरणी राज्य सरकार तसेच संबंधित अधिकाऱ्यांना दोषी ठरवून त्यांच्या विरोधात कारवाईचे निर्देश द्या, अशी मागणी ॲड. तांबवेकर यांनी केली आहे.

- दीड वर्षांपूर्वी वागळे इस्टेटमधील डम्पिंग हटवा म्हणून रिट याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने त्या याचिकेची गंभीर दखल घेत याचिकाकर्त्यांना रिटऐवजी जनहित याचिका दाखल करण्याचा सल्ला दिला होता.
- ठाणेकरांना रोगराईचा धोका लक्षात घेत डम्पिंग ग्राऊंड दुसरीकडे हटवण्याची मागणी करून आंदोलने केली, तक्रारी केल्या. त्यानंतरही प्रशासनाने प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षणाचे नियम धाब्यावर बसवत या तक्रारींना केराची टोपली दाखवली आहे.
- राज्य सरकारसह ठाणे पालिका आयुक्त, प्रदूषण नियंत्रण विभागाचे अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपविभागीय अधिकारी, एमआयडीसीचे विभाग व्यवस्थापक यांच्यावर कारवाईचे निर्देश द्या, अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे.



महत्त्वाचे नामनिर्देशन मुद्दे

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकणी यांनी बैठकीत सविस्तर सादरीकरण करताना काही बाबी स्पष्ट केल्या :

- उमेदवाराचे नाव संबंधित महापालिकेच्या मतदार यादीत असणे आवश्यक
- प्रस्तावक व अनुमोदक हे त्याच प्रभागातील असावेत
- पक्षीय व अपक्ष उमेदवारांना एक प्रस्तावक व एक अनुमोदक आवश्यक
- उमेदवार एकाहून अधिक प्रभागांतून नामनिर्देशन अर्ज दाखल करू शकतो
- निवडणूक फक्त एका जागेवरूनच लढवता येईल
- एका जागेसाठी कमाल चार नामनिर्देशन अर्ज दाखल करता येतील

प्रचार कालावधीनंतर जाहिरातींवर बंदी

राज्य निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

मुंबई। आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, अधिकृत प्रचार कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक, मुद्रित तसेच इतर सर्व माध्यमांमधील निवडणूकविषयक जाहिरातींवर पूर्ण बंदी राहील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी दिली. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत सांगितले की, निवडणूक प्रचार १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपेल. त्यानंतर कोणत्याही माध्यमातून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत. मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी राहील. संबंधित कायद्याच्या तरतुदीनुसार मतदान संपण्याच्या ४८ तास आधी, म्हणजेच १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता प्रचार कालावधी संपतो. प्रचार कालावधी संपल्यानंतर मुद्रित माध्यमातील जाहिरातींसाठी पूर्वपरवानगी किंवा प्रमाणपत्र देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

मार्गदर्शक आदेश :

राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या 'Media Monitoring and Advertisement Certification Order for Election Purposes, 2025' या आदेशात सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत.

अनुज्ञप्तीच्या प्रकारानुसार मद्यविक्री करण्यास किती वाजेपर्यंत सूट?

- एफएल- २ (विदेशी मद्य किरकोळ विक्रीचं दुकान) रात्री 10.30 ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी
- उच्च दजार्ची आणि अतिउच्च दजार्ची श्रेणीवाढ मिळालेली एफएल- २ ला रात्री ११.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत परवानगी
- एफएलडब्ल्यू २ आणि एफएलबीआर २ ला रात्री १०.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत मंजुरी
- एफएल 3 (परवाना कक्ष) आणि एफएल ४ (क्लब अनुज्ञप्ती) यांना पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रासाठी रात्री १.३० ते पहाटे ५ वाजेपर्यंत आणि पोलीस आयुक्तालयच्या परिक्षेत्राच्या व्यतिरिक्त रात्री ११.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजेपर्यंत मंजुरी आहे.
- नमुना ई (बीअर बार) आणि ई-२ यांना मध्यरात्री १२ ते दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजेपर्यंत परवानगी
- सीएल ३ ला महानगरपालिका तसंच 'अ' आणि 'ब' वर्ग नगरपालिका क्षेत्रातील अनुज्ञप्तींसाठी रात्री ११ ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत आणि इतर ठिकाणी रात्री १० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत मंजुरी आहे.

थर्टी फर्स्टला पहाटे ५ वाजेपर्यंत जल्लोष!

मद्यविक्रीच्या वेळेत सूट, सरकारचा मोठा निर्णय... तपासून घ्या वेळ


मुंबई। देशभरात नाताळ आणि नवीन वर्षाच्या स्वागताची उत्सुकता पहायला मिळतेय. अशातच तळीरामांसाठी खुशखबर आहे. कारण नाताळ आणि ३१ डिसेंबरनिमित्त मद्यविक्री आणि बिअर बार उशिरापर्यंत सुरू ठेवण्यास सवलत देण्यात आली आहे. मद्यविक्रीची दुकानं रात्री १ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास सवलत आहे. तर पोलीस आयुक्तालये असणाऱ्या हद्दीत बिअर बार आणि इतर आस्थापनांना पहाटे ५ पर्यंत दुकानं सुरू ठेवण्यास मंजुरी आहे.

नाताळ आणि नववर्षानिमित्त २४ डिसेंबर, २५ डिसेंबर आणि ३१ डिसेंबर रोजी राज्यातील विविध मद्य विक्रीची दुकानं आणि बिअर बार निर्धारित वेळेनंतर रात्री उशिरापर्यंत चालू ठेवण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

वेळेत शिथिलतेची मंजुरी असली तरी सार्वजनिक शांतात, कायदा आणि सुव्यवस्था यांचा विचार करून जिल्हाधिकारी आवश्यकतेनुसार वेळेची शिथिलता कमी करू शकतील. नवीन वर्षाच्या स्वागताच्या वेळी पोलिसांचा जागोजागी चोख बंदोबस्त असणार आहे.

ड्रंक अँड ड्राइव्हसारख्या घटना घडू नयेत यासाठी वाहतूक पोलीस सजग असतील. नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश पोलिसांकडून देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे अवैध दारू विक्रीवर चाप बसवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची पथकं तैनात होतील.





कबुतरांना खाद्य घालणाऱ्या व्यावसायिकाला ५ हजारांचा दंड

माहीममध्ये घडली होती घटना



मुंबई। कबुतरांना खाद्य घालणे हे तेथील स्थानिकांच्या जीवाला धोकादायक आजारांचा संसर्ग पसरवू शकतो, असे नमूद करत सत्र न्यायालयाने कबुतरांना खाद्य घालणाऱ्या व्यावसायिकाला दोषी ठरवले. त्याच्या या कृत्याबद्दल त्याला ५ हजारांचा दंड ठोठावला. मुंबई महापालिकेने सार्वजनिक ठिकाणी त्रासदायक ठरत असल्याचे आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका असल्याचे कारण देत शहरातील बहुतांश भागांत कबुतरांना खाद्य देण्यास बंदी घातल्यानंतर काही महिन्यांनी हा आदेश देण्यात आला. दादर येथील रहिवासी नितीन शेठ (५२) यांना १ ऑगस्टला माहीम परिसरात महापालिकेने बंद केलेल्या 'कबुतरखाना' (कबुतरांना खाद्य देण्याचे ठिकाण) येथे कबुतरांना धान्य टाकताना पकडण्यात आले होते. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी व्ही. यू. मिसाळ (वांद्रे) यांनी शेठ यांना दोषी ठरवले. शेठ यांनी आरोप मान्य करत माफीची मागणी केल्याने त्यांना ५ हजारांचा दंड ठोठावला.

जीवाला धोका निर्माण करणारी कृती

मानवी जीवन, आरोग्य किंवा सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी कृत्ये केल्याबद्दल तसेच सरकारी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल भारतीय न्याय संहिता कलम २२३ (ब) अंतर्गत त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला होता तसेच मानवी जीवनासाठी धोकादायक आजारांचा संसर्ग पसरवण्याची शक्यता असल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

फुकटात लोकल प्रवासासाठी चॅट जीपीटी वापरलं

बनावट रेल्वे पास बनवला अन् डाव फसला... मुंबईत २२ वर्षीय तरुणावर गुन्हा दाखल

मुंबई। आजकाल अक च्या वाढलेल्या सर्रास वापरामुळे फसवणुकीचेही अनेक प्रकार उघडकीस येताना दिसतायत. त्यातलाच एक प्रकार मुंबईच्या उरटळ रेल्वे स्थानकावरून समोर आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवर चॅटजीपीटीचा वापर करून बनावट रेल्वे पास तयार करून लोकल ट्रेनने प्रवास केल्याप्रकरणी २२ वर्षीय तरुणाविरुद्ध रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आदिल अन्सार खान असे आरोपीचे नाव असून, त्याने मुंब्रा ते उरटळ दरम्यान प्रवासासाठी एक महिन्याचा बनावट पास तयार केल्याचे समोर आले आहे.

नेमका प्रकार काय ?

२५ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १२ .४५ वाजता भायखळा रेल्वे स्थानकावर नियमित तिकीट तपासणीदरम्यान हा प्रकार उघडकीस आला. तिकीट तपासनीस कुणाल सावरडेकर हे प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरील मुख्य गेटजवळ तिकीट तपासणी करत असताना त्यांनी आदिल खानकडे तिकीट दाखवण्यास सांगितले. आदिलने आपल्या आयफोन १३ प्रोवर रेल्वे पास दाखवला; मात्र तो अधिकृत यूटीएस मोबाइल ॲपवर नसून केवळ छायाचित्र स्वरूपात असल्याने संशय निर्माण झाला. त्यानंतर त्याला पुढील तपासणीसाठी तिकीट तपासणी कार्यालयात नेण्यात आले. वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर हा पास अधिकृत निकषांनुसार नसून बनावट असल्याचे स्पष्ट केले. तपासात असे निष्पन्न झाले की, खानने एका मित्राच्या मार्गदर्शनाखाली चॅटजीपीटीचा वापर करून हा बनावट पास तयार केला होता. या पासवर २४ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर या कालावधीसाठी मुंब्रा ते उरटळ प्रवासाची वैधता दाखवण्यात आली होती .



आतिहुशारी महागात पडली... तरुणावर गुन्हा दाखल

हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर सावरडेकर यांनी तक्रार दाखल केली. त्यानुसार सीएसएमटी रेल्वे पोलिसांनी खानविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(२) (फसवणूक), ३३६(३) (बनावट कागदपत्रे तयार करणे) आणि ३४०(२) (बनावट इलेक्ट्रॉनिक नोंदींचा वापर) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील संबंधित तरतुदींन्वये गुन्हा नोंदवला आहे.रेल्वे पोलिसांच्या माहितीनुसार, बनावट पासवर अधिकृत सील व माहितीचा समावेश करून तो खरा असल्याचा आभास निर्माण करण्यात आला होता. मात्र, तांत्रिक तपासणीमध्ये हा पास अधिकृत रेल्वे प्रणालीशी संबंधित नसल्याचं निष्पन्न झालं. या प्रकरणी आरोपीविरोधात फसवणूक व बनावट कागदपत्रे वापरल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक चा गैरवापर करत घडणाऱ्या घटना आजकाल वारंवार समोर येऊ लागल्या आहेत. अशा गैरप्रकारांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा रेल्वे पोलिसांनी दिला आहे.

घरफोडी करणारे दाम्पत्य पोलिसांच्या ताब्यात



वसई। नालासोपाराच्या महेश पार्क येथील नालंदा अपार्टमेंटमध्ये १७ डिसेंबर रोजी चोरीची घटना घडली होती. ४८ तासांच्या प्रयत्नानंतर अखेर पोलिसांना या चोरी करणाया दांपत्याला बेड्या ठोकण्यात यश आले आहे. वसई- विरार शहरात अनेक दिवसांपासून घरफोडी, चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. यातच नालासोपाराच्या नालंदा अपार्टमेंटमध्ये राहणार्या अपर्णा शेलार यांच्या घरी 17 डिसेंबर रोजी चोरी झाली होती. या चोरांनी घराच्या दरवाजाची कडी तोडून घरात प्रवेश करून कपाटातील ४ लाख ४० हजार रुपयांचे दागिने तसेच रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरली होती.

याबाबत घरमालकांनी तुळींज पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून ४८ तासात चोरट्यांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी संतोष सुनील जाटप याला सुरत येथून ताब्यात घेतले आहे. त्याच्या चौकशीत त्याने या चोरीमध्ये आपल्या पत्नी गीता संतोष जाटप हिचाही सहभाग असल्याचे गुन्ह्यात कबुली दिली आहे. या प्रकरणी पोलिसांनी या चोरट्यांकडून तब्बल २ लाख ८६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार,३० डिसेंबर २०२५ ते ५ जानेवारी २०२६

बालकांवर टीव्हीचा परिणाम



आजकाल लहान मुलांमध्ये टीव्ही पाहण्याचे फॅड दिवसेंदिवस वाढत आहे. मुलांमध्ये वाढत असलेले हे टीव्ही प्रेम त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने कितपत हानीकारक आहे, याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. जी मुले तासन् तास टीव्हीसमोर बसून सतत कार्यक्रम बघत असतात, त्यांना डोकेदुखी, डोळ्यांना थकवा यासारख्या तक्रारी सतत भेडसावत असतात. आजकालची मनोरंजनाची दुनिया इतकी व्हास्ट झाली आहे की, मुले टीव्हीला आणि कॉम्प्युटरला सतत चिकटलेली असतात. सदैव मनोरंजनाच्या जगतात वावरत असतात. या कारणामुळे त्यांच्याजवळ खेळण्या-बागडण्यासही उसंत नसते. परिणामी त्यांची शारीरिक हालचाल दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यांच्या शरीराला व्यायाम मिळत नाही. व्यायामाअभावी त्यांच्यात अनेक व्याधी उत्पन्न होत आहेत.

शॉपिंग करताना हे लक्षात ठेवा!

सणासुदीला बाजारात अतिशय उत्साहाचे वातावरण असते. करोडो रुपयांची उलाढाल होते, परंतु अशावेळी आंधळेपणाने खरेदी केल्यामुळे फसगत होण्याची शक्यता असते. हे टाळावे म्हणून खरेदीला निघण्यापूर्वी पुढील गोष्टी जाणून घेणे आवश्यक आहे. १९८६ च्या ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकाला पुढील सहा महत्त्वपूर्ण अधिकार मिळालेले आहेत. सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, वस्तू किंवा सेवा आपल्या इच्छेप्रमाणे निवडण्याचा हक्क, ग्राहकाचे म्हणणे ऐकले जाण्याचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क, ग्राहक म्हणून जबाबदारी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी ग्राहक शिक्षण मिळवण्याचा हक्क. या हक्कांच्या आधारे आज सर्वसामान्य ग्राहक पुढील प्रकारच्या व्यवहारात तक्रार दाखल

▮ खरेदी केलेल्या किंवा खरेदीच्या कराराने घेतलेल्या वस्तूंमध्ये दोष आढळणे.

▮ भाड्याने किंवा भाड्याच्या कराराने घेतलेल्या सेवांबाबत त्रुटी किंवा उणिवा असणे.

▮ अनुचित व्यापारी प्रथेने केलेले व्यवहार.

▮ छापील किमतीपेक्षा अधिक किंमत आकरली जाणे.

▮ ग्राहकाच्या जीवाला किंवा सुरक्षिततेला धोका निर्माण होईल अशा वस्तूंची विक्री.

▮ वरील हक्क आणि हक्कांची व्यापकता लक्षात घेऊन उपरोक्त प्रकारच्या तक्रारी बँका सेवा, आर्थिक सेवा, प्रवास, वीजपुरवठा, खाणावळी, हॉटेल्स, करमणुकीची साधने, माहिती प्रसारण, गृहनिर्माण, वैद्यकीय सेवा, शिक्षण तसेच टेलिफोन, रेल्वे, विमान सेवा, बस सेवा आदी सार्वजनिक सेवांच्या संदर्भात आढळून आल्यास ग्राहक याबाबतीत तक्रार करून अन्यायाचे निवारण करू शकतो.

▮ ग्राहकांना हक्क प्राप्त झाले आहेत, परंतु त्यांची जपवणूक करण्यासाठी व ते बजावण्यासाठी ग्राहकांनी काही कर्तव्ये पार पाडायला हवीत.

▮ केवळ आकर्षक जाहिरातीला भुलून खरेदीला उद्युक्त होऊ नका. आपल्याला हव्या असलेल्या वस्तूची प्रथम आपल्याला गरज आहे किंवा नाही हे निश्चित करा. गरज नसताना खेरदी करणे टाळा.

▮ रोजची औषधे खरेदी करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेणे केव्हाही हितावह असते.

▮ खाद्यपदार्थ किंवा वाण सामान घेताना त्यात काही भेसळ नाही, याची खत्री करून घ्यावी.

▮ भेसळ कशी ओळखायची याची माहिती करून घ्यावी.

▮ हल्ली शेव, चिवडा, वेफर्स, पापड इत्यादी वस्तू दुकानात उपलब्ध असतात. त्यांच्या उत्पादकांनी त्यात वापले जाणारे जिन्नस, त्या बनवण्याचे ठिकाण आदींची माहिती त्यांच्या वेष्टनावर नियमानुसार दर्शवलेली नसते. तेव्हा अशावस्तू आपल्या खात्रीच्या दुकानाशिवाय



छातीतील जळजळीमुळे त्रस्त आहात? मग हे करून बघा

छातीत जळजळ होणे ही एक सामान्य बाब आहे. जी प्रत्येकास होते. वास्तविक, ज्या वेळी लोकं जास्त चमचमीत आणि तळकट खातात त्यावेळी त्यांना हा त्रास होतो. याव्यतिरिक्त पोटात आम्ल तयार झाल्यावर देखील छातीत जळजळचा त्रास होतो. कधी-कधी असेही आढळून येतं की विशेष अन्न खाल्ल्यावर किंवा रात्रीच्या वेळी छातीत जळजळ होण्याची वेदना होते. कधी कधी असे ही होतं की झोपल्यावर, वाकल्यावर, दुखणं वाढतं. यामुळे माणूस काही ही करू शकतं नाही. त्याला कुठेदेखील बसता येतं नाही. यावर घरगुती उपाय जाणून घ्या...

छातीत जळजळ होण्याचा त्रासांमध्ये फायदेशीर आहे आलं : आलं औषधीगुणांनी समृद्ध मानली जाते. छातीच्या जळजळच्या त्रासासाठी देखील हा प्रभावी उपाय आहे. कधी ही जेवण केल्यानंतर आपल्या छातीत जळजळ होतं असल्यास, आलं चावून चावून खावं किंवा आल्याचा चहा देखील बनवून पिऊ शकता. या मुळे आराम मिळेल.

थंड दूध देखील जळजळ कमी करतं : दूध तर शरीरासाठी फायदेशीर मानलं जातं, हे छातीची जळजळ कमी करण्यासाठी देखील प्रभावी उपाय आहे. यासाठी आपण एक ग्लास थंड दुधाचं सेवन करावं किंवा त्यामध्ये एक चमचा मध मिसळून देखील पिऊ शकता. यामुळे छातीत जळजळ होण्याच्या समस्येपासून बराच आराम मिळेल.

आवळा देखील जळजळमध्ये आराम देतो : आवळ्याचं सेवन केल्यानं आपण बऱ्याच आजारापासून वाचू शकता. छातीतल्या जळजळला दूर करण्यासाठीच्या उपायांमध्ये हे एक प्रभावी उपाय आहे. यासाठी आपण कच्चा आवळा देखील खाऊ शकता. किंवा आपण अर्धा चमचा आवळ्याची भुकटी करून त्याला एक ग्लास पाण्यासह घेणं अधिक सोयीस्कर आहे. हे आपल्या छातीच्या जळजळीला त्वरा शांत करतं.

छातीच्या जळजळीत केळ देखील फायदेशीर आहे : केळ हे अतिशय फायदेशीर फळ आहे, ज्यामुळे छातीत जळजळ शांत करण्यास मदत करतं. म्हणून जर का आपल्याला छातीत जळजळ होण्याचा त्रास होतं असल्यास त्वरित केळ खा. यामुळे आपल्या छातीतली जळजळ देखील शांत होईल आणि आपल्याला आराम मिळेल.

टीप : हा लेख निव्वळ आपल्या माहितीसाठी देत आहोत, आपल्याला



अगदी कोठेही सहजासहजी उगवणारे पिंपळाचे झाड सर्वांनाचं माहीत असेल. परंतु त्यांच्या पानाचा आपल्या आरोग्यासाठी फायदा होतो, हे फार कमी लोकांना माहित असेल. पौराणिक कथांमध्ये पिंपळाच्या झाडाची पूजाही करण्यात आलेली आहे. आजही अनेक लोक पिंपळाच्या झाडाला पूजतात. पिंपळाचं झाड तुम्हाला दिवसातील २४ तास ऑक्सिजनचा पुरवठा करून देतं. याच्या पानांचा आपल्याला मोठा फायदा होतो. आज आपण या लेखामधून पिंपळाच्या पानाचे आरोग्यदायी

पिंपळाची पानं 'या' आजारांवर ठरतील गुणकारी

जाणून घ्या आरोग्यदायी फायदे

A³fZIY जुन्या पुराण्या आयुर्वेदिक ग्रंथामध्ये पिंपळाचं झाड आणि त्याच्या पानाबद्दल अनेक गुण सांगण्यात आले आहेत. पिंपळाच्या पानाचा रस चेहऱ्यावरील रंगामध्ये उजळपणा निर्माण करतो. तसेच तुमच्या शरीरावर एखादी जखम बरी करण्यासाठी आणि सूज कमी करण्यासाठी पिंपळाचे पान गुणकारी ठरते. पिंपळाच्या पानामुळे तुमचा सेक्शुअर स्टॅमिना वाढवण्यासही मदत होते. तसेच गर्भधारणेसाठीदेखील याचा मोठा फायदा होतो. पिंपळाच्या पानामुळे रक्त शुद्ध होण्यास मदत होते. पिंपळाचे मूळं, सालं, पानं आणि फळं या

तापेवर उत्तम उपाय : तापावर औषध म्हणून पिंपळाचा मोठा फायदा होतो. यासाठी १०-२० पिंपळाची पानं घेऊन पाण्यात उकळवा. हा काढा गाळून प्यायल्याने ताप कमी होतो.

जुलाब : तुम्हाला जुलाबाचा त्रास होत असल्यास पिंपळाची पानं, धणे, खडीसाखर याचा समसमान भाग एकत्र करून घ्या. रोज सकाळ संध्याकाळ साधारण ३-४ ग्रॅम या मिश्रणाचे सेवन करा. तुम्हाला नक्की फरक जाणवेल.

पोटदुखी : पोटदुखीवर पिंपळाच्या पानाचा काढा रामबाण उपाय ठरू शकतो. त्यासाठी पिंपळाची पानं घेऊन त्याचा काढा तयार करा. हा काढा पिऊन तुमचं पोट साफ होतं. त्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्यादेखील दूर होते. तसेच पिंपळाची पानं चाऊन खाल्ली तरीहीदेखील पोटदुखीच्या समस्यापासून आराम मिळतो.

क्षयरोग : क्षयरोगावरील रामबाण उपाय म्हणजे पिंपळाचं मुळ. पिंपळाचे मुळ बारीक करून त्याचे रोज सेवन केल्यास, क्षयरोगाचा धोका कमी होतो.

रक्तविकार रोखण्यास मदत : रक्तविकारांवरील आजारांवर पिंपळाच्या सालांचा काढा गुणकारी ठरतो. यासाठी पिंपळाच्या काढ्यामध्ये ५ ग्रॅम मध मिसळा.



खोकला : पिंपळाची पानं दुधामध्ये उकळून त्यामध्ये साखर घाला. हे मिश्रण दिवसातून दोन वेळा सकाळी आणि संध्याकाळी प्या. असे केल्यास तुम्हाला सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळेल.

हृदयरोगावर गुणकारी : हृदरोगापासून स्वतःचे संरक्षण करायचे असेल तर पिंपळाची १५ ते २० पानं घेऊन एक ग्लास पाण्यात उकळून घ्या. हे पाणी थंड करून गाळून घ्या. हा काढा दर ३ तासांने दिवसभर प्या. हा उपाय केल्याने तुमचे हृदयरोगापासून संरक्षण होते.

पुदिन्याचा चहा घ्या आणि वाढवा स्मरणशक्ती

तुम्ही जर कोणत्या गोष्टी पटकन विसरत असाल किंवा कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला त्रास होत असेल तर पुदिनाची चहा प्या. कारण एका संशोधनातून हे समोर आलयं की पुदिनाची चहा प्यायल्याने माणसाचं आयुष्य निरोगी आणि उत्साही राहते. शिवाय स्मरणशक्तीत सुधारणा देखील होऊ शकते. हे संशोधन करण्यासाठी १८० जणांचा अभ्यास करण्यात आला. त्यांना पुदिन्याची चहा, कॅमोमिल चहा, गरम पाणी असे काही दिवस पिण्यास सांगितले. संशोधनाच्या परिणांमानुसार, कॅमोमिल आणि गरम पाणी पिणाऱ्यांच्या तुलनेत पुदीन्याची चहा पिणाऱ्या लोकांच्या स्मरणशक्तीत महत्त्वपूर्ण सुधारणा झाली. कॅमोमिल चहा पिणाऱ्यांमध्ये एकाग्रता क्षमता कमी वाटली. हे संशोधन आताचं लंडनमध्ये आयोजित केलेल्या मानसिक सोसायटीच्या वार्षिक परिषदेत



मावा करंजी

साहित्य- r कप मैदा, १ कप साजूक तूप, १/२ कप रवा, १/४ ग्लास पाणी, १ कप पिठी साखर, १ कप भाजलेला खवा, १ कप बारीक सुकलेलं खोबरं, बदाम आणि पिस्त्याचे काप, १ चमचा चारोळ्या, केशर आणि चिमूटभर वेलची पूड.



कृती - एका पॅनमध्ये एक चमचा साजूक तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यावर त्यात अर्धा कप रवा भाजून घाला. यामध्ये सुकं खोबरं, चारोळी, बदाम, पिस्त्याचे काप, वेलची पूड, केशर सर्व जिन्नस घाला. पॅनमधले सारण थंड झाल्यावर यामध्ये पिठी साखर, भाजलेला खवा मिसळा आणि सारण तयार करा. एका भांडेात मैदा घेऊन त्यामध्ये अर्धा कप तूप मिसळा. यामध्ये थोडं थोडं करून कोमट पाणी घाला आणि पीठ मळून घ्या. थोड्या वेळासाठी हे मळलेले पीठ ओलसर कपड्याने झाकून ठेवा. मळलेलं पीठ एक सारखे करून लहान लहान गोळ्या बनवा आणि त्याचा लहान पुरीसारखे लाटून त्या पारीमध्ये सारण भरून त्याच्या कडेला दुधाचा हात लावून करंजीच्या साच्यामध्ये ठेवून करंज्या करा. आता एका कढईत तूप टाकून गरम करण्यासाठी ठेवा.आता या करंज्या तुपात टाकून तळून घ्या.

'हे' आहेत उटणे लावण्याचे फायदे

दिवाळी जवळ आली की आपल्याला आठवण होते ती कडाक्याच्या थंडीत पहाटे तेल लावणे आणि मग उटणे लावून केलेल्या अंघोळीची. त्यानंतर होणारा फराळ आणि नवनवीन कपडे घालून फटाके फोडण्याचा आनंद. यामध्ये अभ्यंगस्नानाला आपल्याकडे पूर्वीपासून महत्त्व आहे. अभ्यंगाचे आयुर्वेदात असंख्य वर्षांपूर्वी महत्त्व सांगितले आहे. विविध नैसर्गिक घटकांपासून तयार झालेले हे सुगंधी एक प्रकारचे स्क्रबर असल्याचेच म्हणावे लागेल. हे उटणे केवळ थंडीतच नाही तर एरवीही वापरायला हवं, ज्यामुळे चेहऱ्याची त्वचा चांगली होण्यास मदत होते. या उटण्याचे शरीराला होणारे फायदे काय आहेत पाहूया...

◆ **त्वचा मुलायम होण्यासाठी**

दिवाळी हा थंडीच्या दिवसांत येणारा सण. थंडीमुळे शरीराची त्वचा कोरडी होते. अनेकदा अशा कोरड्या त्वचेमुळे आगही होते. या समस्येपासून सुटका व्हावी यासाठी पूर्वीपासून उटण्याचा वापर केला जातो. उटण्यामधील आयुर्वेदिक घटकांमुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होऊन ती मुलायम होण्यास सुरुवात होते.



उटण्यामध्ये असणारी चंदन पावडर आणि हळद यामुळे त्वचा उजळण्यास मदत होते. त्यामुळे दिवाळीशिवायही एरवी आणि विशेषतः थंडीच्या दिवसात आठवड्यातून एकदा उटण्याचा वापर जरुर करावा.

◆ **नैसर्गिकरीत्या चमक देते**

उटण्यामध्ये रक्तचंदन, वाळा, चंदन, वेखंड, कात, नागरमोथा यांसारख्या वनस्पती आणि खोडांचा वापर केला जातो. हे घटक त्वचेला स्क्रबर म्हणून काम करतात. यामुळे काळवंडलेली त्वचा उजळण्यास मदत होते. याशिवाय उटण्याच्याबरोबरीने बेसन पीठही लावल्यास ते फायद्याचे ठरते. चंदनामुळे शरीराला थंडावा मिळतो

◆ **सुरकुत्या टाळणे शक्य**

वयानुसार त्वचेला सुरकुत्या पडण्याचे प्रमाण उटण्यामुळे कमी होते. हळदीमध्ये ॲन्टीएजिंग घटक असल्याने त्याचा त्वचे ला फायदा होतो. त्वचा दीर्घकाळ तजेलदार आणि टवटवीत दिसते. याशिवाय उटण्यात मध किंवा दूध टाकल्यास त्याचा जास्त फायदा होतो. मध मिसळल्यास त्वचा मुलायम होण्यास मदत होते.


◆ **चेहऱ्यावरील अनावश्यक केसांची वाढ रोखण्यास उपयुक्त**

चेहऱ्यावरील किंवा हाता-पायावरील केस जास्त वाढू नयेत यासाठी लहानपणी बाळाला अंघोळ घालताना मसूर डाळीचे पीठ किंवा हरभरा डाळीचे पीठ लावले जाते. मात्र तरीही केस कमी न झाल्यास उटणे हा अतिशय उत्तम पर्याय असतो. उटणे लावून ते गोलाकार फिरवल्यास त्याचा केसांची वाढ थांबण्यासाठी उपयोग होतो. मात्र अशाप्रकारे उटणे चोळताना त्याचा त्वचेवर वाईट परिणाम होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.



मूत्रपिंड प्रत्यारोपणास हा आहार आहे फायद्याचा

भूमध्य सागरी आहारामुळे ज्या रुग्णात मूत्रपिंड प्रत्यारोपण झाले आहे, त्यांना फायदा होऊ शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. भूमध्य सागरी आहारात जास्त प्रमाणात भाज्या, ऑलिव्ह तेल, प्रथिनांचा मध्यम प्रमाणात वापर या गोष्टींचा समावेश होतो. या आहारामुळे प्रत्यारोपण केलेली मूत्रपिंडे व्यवस्थित काम करतात. याबाबतचे संशोधन क्लिनिकल जर्नल ऑफ द अमेरिकन सोसायटी ऑफ नेफ्रॉलॉजी या नियतकालिकात प्रसिद्ध झाले असून त्यात असे दिसून आले की, मूत्रपिंड प्रत्यारोपणानंतरच्या दहा वर्षांनी एक तृतीयांश रुग्णात मूत्रपिंडे काम करेनाशी झाली. नेदरलँडसमधील युनिव्हर्सिटी ऑफ ग्रॉनिंगगेनच्या संशोधकांनी मूत्रपिंड प्रत्यारोपण झालेल्या ६३२ रुग्णांची माहिती घेतली, त्यात त्यांना आहाराविषयी प्रश्न विचारण्यात आले होते. काहींनी भूमध्य सागरी आहार सेवनाचे पालन केले होते. ज्या रुग्णांनी भूमध्य सागरी आहार घेतला, त्यांच्यात मूत्रपिंड प्रत्यारोपण जास्त यशस्वी झालेले दिसून आले. भूमध्य सागरी आहारात मासे, फळे, भाज्या, डाळी, दाणे, बदाम, ऑलिव्ह तेल यांचा समावेश होतो. तसेच मांस व दुग्धजन्य पदार्थ कमी प्रमाणात घेतले जातात. ५.२ वर्षांच्या कालावधीत ११९ रुग्णांच्या बाबतीत मूत्रपिंड निकामी होण्याचे प्रमाण कमी होते. भूमध्य सागरी आहार सेवनात ज्यांना नऊ गुण होते, त्यांची मूत्रपिंडे जास्त चांगली राहिली, ज्यांना दोन गुण होते त्यांच्यातही मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता ३० टक्के कमी झाली. भूमध्य सागरी आहार हा हृदयरोग व मूत्रपिंड विकारात उपयोगी असतो. अँटोनियो गोम्स यांनी सांगितले की, भूमध्य सागरी आहाराचे चांगले परिणाम असतात त्यावर आणखी एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. असे असले तरी आहाराच्या मदतीने मूत्रपिंड प्रत्यारोपणास पूरक आहार ठरवताना आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक ठरते.



वाय-फाय पासवर्ड विसरणं नवीन नाही. अनेक युजर्स आपल्या घराच्या वाय-फाय नेटवर्कशी लॅपटॉप किंवा स्मार्टफोन कनेक्ट करतात आणि मग त्या नेटवर्कचा पासवर्ड विसरून जातात. त्यामुळे घरात जेव्हा नवीन डिव्हाइस येतो, मग तो घरच्यांचा असतो किंवा पाहुण्यांचा तेव्हा पासवर्डची शोधाशोध होते. परंतु जर तुम्ही कुठेही पासवर्ड लिहून ठेवला नसेल तर असे अनेक मार्ग आहेत, ज्यांच्या मदतीनं तुम्ही वाय-फाय पासवर्ड शोधून काढू शकता. या लेखात आपण अँड्रॉइड, आयओएस आणि विंडोजमधून वाय-फाय पासवर्ड कसा मिळवायचा, हे पाहणार आहोत.


वाय-फायचा पासवर्ड विसरलात?

अँड्रॉइड, आयफोन, विंडोज आणि मॅकवर देखील मिळवा माहिती

अँड्रॉइड मोबाइलवर वाय-फाय पासवर्ड कसा बघायचा...

अँड्रॉइडमध्ये एक छुपा मार्ग आहे ज्याच्या मदतीनं सेव्ह केलेला वाय-फाय पासवर्ड जाणून घेता येतो. जर तुमच्याकडे अँड्रॉइड १० किंवा त्यावरील ओएस असलेला डिव्हाइस असेल तर तुम्ही सेव्ह केलेल्या नेटवर्कचा पासवर्ड पाहू शकता. त्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा.

- सेटिंग ॲपमध्ये जा आणि 'वाय-फाय अँड नेटवर्क' ऑप्शनवर क्लिक करा.
- कनेक्टेड नेटवर्कच्या समोर असलेल्या गीयर आयकॉन किंवा ज्या नेटवर्कचा पासवर्ड हवा त्यांच्यासमोरील लॉक आयकॉनवर क्लिक करा.
- त्यानंतर 'शेअर पासवर्ड' वर क्लिक करा. तुम्हाला फिंगरप्रिंट किंवा पिन वापरून स्क्रीन अनलॉक करावी लागेल.
- तुम्हाला स्क्रीनवर एक क्यूआर कोड दिसेल, ज्याच्या खाली पासवर्ड



असेल.

- तुम्ही तो पासवर्ड तिथून थेट शेअर करू शकता किंवा ज्या व्यक्तीला पासवर्ड हवा , त्याला क्यूआर स्कॅन करायला सांगू शकता.

आयओएस मोबाइलवर वाय-फाय पासवर्ड कसा शोधायचा...

आयओएस डिव्हाइसवर वाय-फाय पासवर्ड मिळवणं थोडं कठीण आहे. ॲपलची प्रायव्हसी आणि सिक्युरिटी थोडी स्ट्रिक्ट आहे त्यामुळे आयफोनवर सेव्ह केलेल्या वाय-फाय नेटवर्कचा पासवर्ड मिळवणं जवळपास अशक्यच आहे. परंतु यावर एक उपाय आहे, त्यासाठी तुमच्याकडे मॅकओएस असलेला लॅपटॉप किंवा पीसी हवा. जर तुमच्याकडे मॅकओएस असलेली सिस्टिम असेल आणि तुम्हाला आयओएसवरील वाय-फाय पासवर्ड शोधायचा असेल तर पुढील स्टेप्स फॉलो करा:

- तुमच्या आयफोनवर सेटिंगमध्ये जा आणि आयक्लाऊडच्या ऑप्शनमध्ये. तिथे किचेनचा पर्याय मिळेल त्याचा टॉगल ऑन करा.
- त्यानंतर सेटिंगमध्ये जाऊन पर्सनल हॉटस्पॉट ऑन करा.
- आता तुमचा मॅक आयफोनच्या पर्सनल हॉटस्पॉटशी कनेक्ट करा. एकदा का हॉटस्पॉट कनेक्ट झाला की तुम्ही तुम्ही स्पॉटलाईट सर्च सुरू करू शकता (CMD+Space) आणि नंतर Keychain Access टाइप करा.
- एंटर दाबा आणि आता तुम्हाला हवा असलेला वाय-फाय नेटवर्क शोधा.
- तिथे एक पॉपअप विंडोमध्ये नेटवर्क डिटेल्स असतील, जिथे शो पासवर्डवर क्लिक करा. सिस्टिम तुमच्याकडे ॲडमिन क्रेडेन्शियल मागेल.
- ते दिल्यानंतर तुम्हाला वाय-फाय नेटवर्कचा पासवर्ड दिसेल.

विंडोज पीसीवर सेव्ह केलेले वाय-फाय पासवर्ड बघण्याची पद्धत

- विशेष म्हणजे तुम्ही सेव्ह केलेल्या नेटवर्कचा पासवर्ड देखील विंडोज डिव्हाइसवर मिळवू शकता. त्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा.
- स्टार्ट मेन्यूमध्ये Command Prompt टाइप करा
- पुढील कमांड रन करा: netsh wlan show profile.
- तुमच्या समोर सेव्ह केलेल्या वाय-फाय नेटवर्कची यादी येईल.
- ज्या नेटवर्कचा पासवर्ड हवा आहे तो निवडा. त्यानंतर पुढील कमांड रन करा : netsh wlan show profile **** key=clear. (इथे *** च्या यादीतील जागी नेटवर्कचं नाव टाका.)
- त्यानंतर तुम्हाला त्या वाय-फाय नेटवर्कचा पासवर्ड दिसू लागेल.

विंडोज पीसी आणि लॅपटॉपवर वाय-फाय पासवर्ड कसा मिळवायचा...

विंडोज लॅपटॉप किंवा डेस्कटॉपवर अनेक मार्ग आहेत ज्यांच्या मदतीनं वाय-फाय पासवर्ड शोधात येईल. तुम्ही ज्या नेटवर्कशी कनेक्टेड आहात त्याचा पासवर्ड सहज मिळवण्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा :

- स्टार मेन्यू ओपन करा आणि नेटवर्क स्टेटस सर्च करा.
- किंवा तुम्ही उजवीकडे खाली असलेल्या वाय-फाय आयकॉनवर क्लिक करून नेटवर्क अँड इंटरनेट सेटिंग देखील ओपन करू शकता.
- त्यानंतर चेंज अडॅप्टर सेटिंगवर क्लिक करा. एक नवीन विंडो ओपन होईल जी वाय-फाय कनेक्शन दाखवेल.
- वाय-फायवर डबल क्लिक करा आणि नंतर वायरलेस प्रॉपर्टीज ओपन करा.

संपादकीय

तेव्हा कुठे जातो स्त्री सन्मान?







संपादक दिपक मोरेश्वर नाईक

काही दिवसांपूर्वी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पाटलीपुत्र (पाटणा) येथे नवनियुक्त 'आयुष' डॉक्टरांना नियुक्तीपत्रे प्रदान करतांना युनानी डॉ. नुसरत परवीन यांचा हिजाब खेचला. विरोधी पक्ष राष्ट्रीय जनता दलाकडून हा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवरून प्रसारित झाल्यावर हा प्रकार देशभरात झपाट्याने पसरला. यामुळे विरोधी पक्षासह सामाजिक माध्यमांवरूनही मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. या धक्क्यामुळे डॉ. नुसरत परवीन यांनी बिहारमध्ये नोकरी करण्यास नकार दिल्याच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये आल्या आहेत. 'शालेय जीवनापासून वैद्यकीय सेवेत रुजू होईपर्यंत मी नियमित हिजाब घालत आहे; परंतु असा अनुभव मला प्रथमच आला', अशी डॉ. नुसरत परवीन यांची भावनिक प्रतिक्रियाही माध्यमांनी छापली. एखाद्या महिलेचा हिजाब ओढणे आणि तेही सार्वजनिक ठिकाणी असे करणे, हे मुख्यमंत्रीपदावरील व्यक्तीला शोभनीय नाही. या प्रकारानंतर राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आदी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी नितीश कुमार यांच्यावर सपाटून टीका केली आहे. काँग्रेसने टीका करतांना नितीश कुमार यांच्या या कृत्याला 'निर्लज्जपणा', 'नीच कृत्य' असे म्हटले आहे. 'ते क्षमा मागण्याच्या पात्रतेचेही नाहीत', असे म्हणत काँग्रेसने नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचे त्यागपत्र देण्याची मागणी केली आहे. नितीश कुमार यांच्या या कृत्याचे कधीही समर्थन होऊ शकत नाही; कारण भारतीय संस्कृती स्त्रियांचा आदर करण्याची शिकवण देते. त्यामुळे काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल किंवा अन्य विरोधी पक्षांनी केलेली टीका काही वावगे नाही; परंतु मुसलमान स्त्रीचा हिजाब ओढणे, हा तिचा अपमान ठरत असेल, तर स्त्रीच्या अब्रूला हात घालणे, हा तर त्यापेक्षा मोठा अपराध आहे, हे मान्य करावेच लागेल. अशा अपराधाला मृत्यूदंडाचीच शिक्षा व्हायला हवी, नव्हे का ? नितीश कुमार यांची मुसलमान स्त्रीचा हिजाब ओढण्याची कृती ही चुकीचीच आहे; परंतु स्त्री कोणत्या धमार्ची आहे, यावरून जर कुणी तिच्या सन्मानाचा स्तर ठरवत असेल, तर तो त्याहीपेक्षा मोठा अपराध आहे. काँग्रेस, साम्यवादी आणि तथाकथित पुरोगामी मागील अनेक वर्षांपासून हा अपराध करत आहेत. एका मुसलमान महिलेच्या चेहऱ्यावरील हिजाब ओढल्यावर जे स्त्री सन्मानाची भाषा करतात, तेच लव्ह जिहादच्या जाळ्यात सहस्त्रो हिंदु युवतींवर अत्याचार झाले, तरी तोंडातून चकार शब्दही काढत नाहीत. तेव्हा कुठे जातो यांचा स्त्री सन्मान?

हिंदु कि मुसलमान यांवरून महिला सन्मान ठरतो?

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या धर्मांध संघटनेने हिंदु धर्मातील ब्राह्मण, गुजराती, जैन, शीख, मराठी आदी समुहानुसार हिंदु युवतींना लव्ह जिहादमध्ये फसवण्यासाठी 'रेट कार्ड' घोषित केले आहे. काही वर्षांपूर्वी लव्ह जिहादच्या प्रकरणात अटक झालेल्या मुसलमान युवकाकडेही 'रेट कार्ड' आढळून आली. त्या वेळी काँग्रेस किंवा साम्यवादी यांना महिलांचा सन्मान आठवला नाही. डॉ. नुसरत परवीन यांच्या सन्मानाच्या गोष्टी हे काँग्रेसचे केवळ न केवळ ढोंग आहे. काँग्रेसला जर खरोखरच महिलांच्या सन्मानाची चाड असती, तर लव्ह जिहादमध्ये अडकलेल्या हिंदु युवतींना न्याय मिळावा, यासाठीही काँग्रेसने आवाज उठवला असता. लव्ह जिहादचे प्रकार होऊ नयेत, यासाठी कायदा करण्याची मागणी केली असती; परंतु महिला हिंदु कि मुसलमान? यावरून काँग्रेसचा महिला सन्मान ठरतो.

राजकीय सूत्रावरून स्त्री सन्मान ठरतो का?

वर्ष २०१४ मध्ये झारखंड येथील राष्ट्रीय नेमबाज तारा सहदेव यांच्याशी 'रणजित कुमार कोहली' या खोट्या नावाने रकीबुल हसन या मुसलमानाने हिंदु पद्धतीने विवाह केला. विवाहानंतर काही दिवसांनी तो मुसलमान असल्याचे तारा सहदेव यांच्या लक्षात आल्यावर त्या न्यायालयात गेल्या. तब्बल ९ वर्षे तारा सहदेव यांनी न्यायालयीन लढा दिला. शेवटी वर्ष २०२३ मध्ये त्यांना फसवर्णाया रकीबुल हसन याला विशेष सीबीआय न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा दिली. या प्रकरणातही काँग्रेसने मौन बाळगले. अशा प्रकारे हिंदु महिला आणि युवती यांच्यावरील अत्याचाराची देशभरात दिवसागणिक कितीतरी प्रकरणे उघड होत आहेत; मात्र अत्याचार करणारे मुसलमान असल्यामुळे त्यांचा हिंदु महिलांवरील अत्याचार काँग्रेसला क्षम्य वाटत असावा. राजकीय लाभाची गोळा-बेरीज करून स्त्री सन्मानाची भूमिका ठरवणारा हा काँग्रेसचा निर्लज्जपणा आहे.

त्याहीपुढे काँग्रेस किती निर्लज्ज आहे, याची कितीतरी उदाहरणे सापडतील. डॉ. नुसरत परवीन यांचा हिजाब ओढणारे नितीश कुमार हे राजकीय शत्रू आहेत, यासाठीच काँग्रेस टीका करत आहे. डॉ. परवीन यांचा अपमान कुणी मुसलमानानेच केला असता, तर मात्र काँग्रेसच्या नेत्यांनी तोंडातून शब्दही काढला नसता. वर्ष २०१५ मध्ये उत्तराखंडमधील शायरा बानो या मुसलमान महिलेला रिझवान अहमद या तिच्या नवऱ्याने पत्राद्वारे ३ वेळा 'तलाक' कळवून घटस्फोट दिला. या विरोधात शायरा बानो न्यायालयात गेल्या, तेव्हा काँग्रेसने त्यांना समर्थन दिले नाही. उलट वर्ष २०१९ मध्ये भाजप शासनाने 'तिहेरी तलाक'च्या विरोधात 'मुसलमान महिला (विवाहावरील हक्कांचे संरक्षण) कायदा' आणला त्या वेळी काँग्रेसने साळसूद भूमिका घेतली. या कायद्याद्वारे तोंडी, लेखी, 'एस्.एम्.एस्.' (लघुसंदेश) किंवा व्हॉट्सॲप यांद्वारे तिहेरी तलाक रहित करण्यात आले. या वेळी मुसलमान महिलेवरील अन्यायापेक्षाही काँग्रेसला मुसलमान समाजाची 'व्होट बँक' (एकगठ्ठा मते) महत्त्वाची होती. काँग्रेसला मुसलमान महिलांच्या सन्मानाची नव्हे, तर मुसलमानांच्या मतांचे पडले आहे, हेच यावरून दिसून येते.

काँग्रेसची ही परंपरा आताची नाही. वर्ष १९७८ मध्ये मध्यप्रदेश येथील ६२ वर्षीय शाहबानो बेगम या मुसलमान महिलेला त्यांचे पती महंमद अहमद खान यांनी लग्नाच्या ४० वर्षांनंतर तिहेरी तलाक दिला. त्या वेळी त्यांना ५ मुले होती. 'मुस्लिम पर्सनल लॉ'नुसार घटस्फोटानंतर केवळ ३ मास पोटगी देता येते; परंतु सर्वोच्च न्यायालयाने भारत धर्मनिरपेक्ष देश असल्याचे नमूद करत महंमद खान यांना शाहबानो यांना पोटगी देण्याचा निर्णय दिला. मुसलमानांच्या मतांसाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी वर्ष १९८६ मध्ये 'मुस्लिम महिला (घटस्फोट हक्क संरक्षण) कायदा' संमत करून तिहेरी तलाकला संरक्षण दिले. या कायद्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने शाहबानो यांना दिलेला निर्णय आपोआप रहित झाला. केवळ मुसलमानांच्या मतांसाठी राजीव गांधी यांनी एका वृद्ध आणि असाहाय्य महिलेचाही सन्मान राखला नाही. अशा परंपरेच्या काँग्रेसला डॉ. नुसरत परवीन यांच्या सन्मानाची नाही, तर मुसलमानांच्या मतांची चिंता आहे, हे लक्षात घ्या. प्रश्न हिजाबचा असो, तीन तलाकचा असो वा मुसलमान लांगूलचालनाचा असो, भारतामध्ये धर्मांधतेला वेळीच ठेचणे, हाच त्यावरील एकमात्र उपाय होय!

उडता महाराष्ट्र नको...



वर्ष संपायला अवघे काही दिवस शिल्लक राहिलेत. त्यामुळे अनेकांनी थर्टीफर्स्ट साजरा करायचे प्लान आखले असतील. कुणी थंड हवेच्या ठिकाणी जाईल, तर कुणी समुद्रकिनारी... उरले सुरलेले मित्रमंडळी वा कुटुंबकबिल्यासहीत टेरेस किंवा हॉलमध्येच नवे वर्ष साजरे करतील. या निमित्ताने असंख्य स्पॉन्सर्ड पाटयार्ही आयोजित केल्या जातील. जिथे धनदांडगे लाखांचे तिकीट काढून मनमुराद मजा करतील. ३१ डिसेंबरच्या रात्री घडाळ्यात बाराचा ठोका पडताच, फसफसणारे पेले एकमेकांना भिडतील, धुरांच्या वलयांनी छताचे कोपरे काळवंडू लागतील. नव्या जमान्याच्या सेलिब्रेशनची ही नवी तऱ्हा. नवीन वर्षाच्या सुरुवातीला नवे संकल्प करत ते पूर्ण करण्याचे ध्येय ठेवणारे विरळच. उलट, थर्टीफर्स्टच्या रात्री नशेत धुंद होऊन वर्षाच्या पहिल्या दिवसाची संध्याकाळ किंवा थेट रात्र पाहणारेच आता अधिक झालेत. मध्यरात्रीच्या काळोखात रेव्ह पार्टयांच्या नावाखाली चालणारे ड्रग्ज-सेक्स रॅकेटचाही भांडाफोड होईल. त्याच्या बातम्यांनी दुसऱ्या दिवसांचे पेपर भरून जातील. मागच्या काही वर्षामध्ये तरुणांना पोखरत असलेली ड्रग्ज ॲडिक्शनची कीड आणखीनच खोलवर घुसू लागली आहे. किमान मागच्या काही महिन्यांमध्ये झालेल्या छापेमारीवरून तरी हेच म्हणावे लागेल. महायुती सरकारच्या सत्ताकाळात मुंबईसह महाराष्ट्रातील वेगवेगळे जिल्हे मेफेड्रोन ड्रग्ज (एमडी) उत्पादनाची केंद्रे बनू लागल्याचे भयावह चित्र समोर येत आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच सांगली जिल्ह्यात एका एमडी ड्रग्ज उत्पादन कारखान्याचा पर्दाफाश झाला होता. जिथे २४५ कोटी किमतीचे एमडी जप्त करण्यात आले होते. दाऊद इब्राहिमचा जवळचा सहकारी सलीम डोला याच्या देखरेखीखाली हा कारखाना चालवला जात होता. पाठोपाठ वर्ध्यातील कारखाना उद्ध्वस्त करून पोलिसांनी १२८ किलो एमडी जप्त केले. मुंबईला लागून असलेल्या मीरा-भाईंदर, नालासोपारा परिसरातूनही असेच अनेक कारखाने उद्ध्वस्त करण्यात आले आणि आता अलीकडेच साताऱ्यात एका शेडमध्ये सुरू असलेल्या कारखान्याचाही पोलिसांनी छडा लावला. सध्या या प्रकरणावरून महाराष्ट्रात जोरदार राजकारण सुरू आहे. त्याकडे आपण वळूच परंतु, एका अहवालानुसार मागच्या १० महिन्यांमध्ये अंदाजे १५ हजार कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज, रसायने, साहित्य पोलिसांनी विविध ठिकाणी छापेमारी करून जप्त केले आहे. हा आकडा केवळ डोके चक्रावणाराच नाही तर समाजाला चिंतेत टाकणाराही आहे. गेल्या वर्षीदेखील पुण्यातले एमडी ड्रग्ज रॅकेटही असेच गाजले होते. सध्या ज्या ड्रग्ज रॅकेटवरून राजकारण तापलेय ते रॅकेट आहे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरे गावच्या शेजारील सावरी गावचे. इथे मुंबई पोलिसांनी छापेमारी करून सुमारे १५० कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त केले. एका लहानशा शेडमध्ये हा कारखाना सुरू होता. ज्या जागेत हा कारखाना सुरू होता, त्या जागेचा सातबारा एकनाथ शिंदे आणि त्यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या नावावर असल्याचा विरोधकांचा दावा आहे. या जागेपासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर प्रकाश शिंदे यांचे एक रिसॉर्ट कम रेस्टॉरंटही आहे. या रेस्टॉरंटमधून ड्रग्ज बनवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना जेवण जायचे, त्यामुळे शिंदे कुटुंबाचे या रॅकेटशी लागेबांधे असल्याचा आरोप करत विरोधकांनी रान उठवून दिले आहे. परंतु ही जागा दरे गावचे सरपंच रणजीत शिंदे यांना काही महिन्यांपूर्वी वापरायला दिली होती, असे म्हणत प्रकाश शिंदेंनी आपले हात वर केलेत. तर, पोलिसांनीही रणजीत शिंदेंचे या प्रकरणाशी काही कनेक्शन नसल्याचा खुलासा केला. या प्रकरणाला अनेक पैलू आहेत.

एक तर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने साताऱ्यात जाऊन केलेली ही कारवाई राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ग्रीन सिग्नलशिवाय झालेली नाही. म्हणजेच त्यांनी आपल्या कॅबिनेटमधील सहकाऱ्यापासून लपवून त्यांच्याच जागेत ही कारवाई करायला पोलिसांना आदेश दिले होते, हे स्पष्ट होते. पोलिसांनी या कारखान्यात काम करणाऱ्या ३ कामगारांना अटक केली खरी, परंतु रणजीत शिंदेंची चौकशी करून त्यांना सोडून दिले. महाराष्ट्रात आतापर्यंत कधीच कुठल्याही मंत्र्यावर ड्रग्ज रॅकेटमध्ये सहभागी असल्याचा आरोप झालेला नाही. कारण हा अत्यंत गंभीर आरोप आहे. भलेही शिंदे बंधू या प्रकरणात सहभागी नसतील, तरी पोलिसांनी त्यांची चौकशी करायला हवी. ज्यांच्यावर आरोप झाले ते रणजीत शिंदे शिवसेनेचे तालुकाध्यक्ष असून प्रकाश शिंदे माजी नगरसेवक आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदेंनाही या प्रकरणाशी माझा संबंध नाही म्हणत हात वर करता येणार नाहीत. पोलिसांनीही या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करायला हवी. महामुंबईत दर दिवसाआड एमडी ड्रग्जची तस्करी करणार्यांना पकडले जाते. त्यांच्याकडून लाखो रुपये किमतीचे ड्रग्जही जप्त केले जाते. परंतु आता ड्रग्जची ही मुळे गावखेड्यांच्या जमिनीत घुसू लागली आहेत.

महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये सापडत असलेल्या ड्रग्जच्या साठ्यांवरून समाजामध्ये व्यसनाधीनता वाढत चालल्याचे सिद्ध होत आहे. एमडी ड्रग्ज बनवायला सोपे असल्यामुळे त्याचे उत्पादन वाढू लागल्याची कबुली देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती. परंतु त्यांना या ड्रग्ज उत्पादन आणि तस्करीला आळा घालण्यात अद्याप यश आलेले नाही. कमी वयाची मुले अमली पदार्थांकडे ओढली जात आहेत. पूर्वी ३० वर्षांपुढील तरुणांची संख्या मोठी असायची. आता १३-१४ वर्षांपासून ते पंचविशीपर्यंतचे तरुण मोठ्या प्रमाणात आढळून येतात. दुसरी गोष्ट म्हणजे, पूर्वी व्यसन हे प्रामुख्याने मुलांमध्ये दिसायचे, आता मुलींमध्येही व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत आहे. सिगारेट ओढणे, दारू पिणे, ड्रग्ज घेणे या सवार्ला सोशल ॲक्सेप्टन्स किंवा सार्वजनिक मान्यता मिळणे हीदेखील सामाजिकदृष्ट्या अत्यंत चिंतेची बाब आहे. कधीकाळी दारू पिणाऱ्या माणसाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन नकारात्मक असायचा, आता याउलट स्थिती दिसते. जो व्यसन करत नाही तो कमजोर आणि पुढारलेल्या जगापासून लांब आहे, असे म्हटले जाते. काही वर्षांपूर्वी याच व्यसनाधीनतेने पंजाबमधील लाखो तरुणांचे जीवन वाया गेले. म्हणूनच पंजाबप्रमाणे उडता महाराष्ट्र व्हायला नको, यासाठी सरकारने सतर्क राहायला हवे.

महाराष्ट्र शासन

जिल्हा जलसंधारण अधिकारी

मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे यांचे कार्यालय

पत्ता : कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, कळवा (प) जि. ठाणे

दूरध्वनी क्र. २५४२८१२७ ई-मेल पत्ता :- **eeemilsdnt@gmail.com**

निविदा सूचना क्र. ब -१/७८/जिजअ/सन २०२५-२६

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग कळवा - ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम (सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत) कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र	कामाचे नांव
१	मौजे. खापरीकामतपाडा ता. मुरबाड जि. ठाणे येथे गेटेड को.प.बंधारा/गेटेड सिमेंट काँक्रीट बंधारा बांधणे साठी सर्वेक्षण व अन्वेषण करणे. रु. ६,१०,१४८/-

६. कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/१२/२०२५ ते ०६/०१/२०२६ दुपारी १६.०० या कालावधीत कार्यालयीन वेळेत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध असतील.

७. पूर्ण भरलेले निविदा फॉर्म दिनांक ३०/१२/२०२५ ते ०७/०१/२०२६ दुपारी १६.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.

८. कोरे निविदा फॉर्म सार्वजनिक बांधकाम विभागातील नोंदणी प्रमाणपत्र तसेच पॅनकार्ड, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत सादर केल्यानंतर व निविदा शुल्क भरल्यानंतर देण्यात येतील.

९. निम्नस्वाक्षरीकार हे कोणताही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.

१०. सविस्तर निविदा सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध राहील.

जा.क्र.जिजअ(मृवजसं)/ले-२/४४१७/सन २०२५
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग,
कळवा-ठाणे यांचे कार्यालय
दिनांक २६.१२.२०२५

सही
(फरीद खान)
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग
कळवा-ठाणे

प्रत - उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग, बदलापूर, शहापूर यांना नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यासाठी.
प्रतः- नोटीस बोर्ड प्रसिध्दीसाठी

क्र. जिमाका/ठाणे/ जाहि/२०२५-२६/१५२

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार,३० डिसेंबर २०२५ ते ५ जानेवारी २०२६

५ रुपयांत मनसोक्त जेवणाची थाळी

अटल कॅन्टीनची देशभरात चर्चा



योजनेचा कसा मिळणार फायदा?

अटल कॅन्टीनमुळे गरीबांना सन्मानाने जेवण मिळेल आणि उपासमारी कमी होईल.हे कॅन्टीन दिल्लीचा आत्मा बनेल, असे मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितले. लोकांच्या प्रतिक्रियेनुसार आणखी कॅन्टीन वाढवल्या जातील. अटलजींच्या नावाने ही योजना त्यांच्या सुशासन आणि गरीबकल्याणाच्या वारशाला साजेशी असल्याचे सरकारकडून सांगण्यात आलंय.

मुंबई। उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सुरु झालेल्या या योजनेत अवघ्या १० रुपयांच्या शिवभोजन थाळीत नागरिकांना पोटभर अन्न मिळतं. महाराष्ट्रात गरीब आणि गरजू नागरिकांसाठी सुरू असलेल्या शिवभोजन थाळीमध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण आणि १ मूग भात असा सकस आहार मिळतो. ही योजना दुपारी १२ ते २ या वेळेत कार्यान्वित असते. ज्यामध्ये सरकार उर्वरित अनुदानापोटी रक्कम देत असते. कोरोना काळात या याजनेचा लाभ महाराष्ट्रातील लाखो नागरिकांना झाला. दरम्यान अशाच एका योजनेची चर्चा देशभरात सुरु आहे. जिथे अवघ्या ५ रुपयांमध्ये थाळी मिळतेय. कोणती आहे ही योजना? सविस्तर जाणून घेऊया.

दिल्ली सरकारने माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी नंतरच्या १०१ व्या जयंतीनिमित्त एक योजना सुरु केलीय. याअंतर्गत राजधानी दिल्लीच १०० अटल कॅन्टीन सुरू करण्यात येत आहेत. या कॅन्टीनचा मुख्य हेतू गरीब, मजुरांना आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना स्वस्तात पौष्टिक जेवण उपलब्ध करून देणे हा आहे. यामुळे कोणालाही उपाशी झोपावे लागणार नाही, अशी सरकारची भावना आहे. ही योजना अटलजींच्या 'गरिबी ही फक्त पैशांची कमतरता नव्हे, तर संधीची कमतरता आहे', या विचाराने प्रेरित असल्याचे सांगण्यात येत आहे.

कॅन्टीनची संख्या

अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने २५ डिसेंबर रोजी ४५ कॅन्टीनचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर उरलेली ५५ कँटीन लवकरच सुरू होणार आहेत. दिल्लीतील नरेला, बवाना, शालिमार बाग, राजौरी गार्डन, ग्रेटर कैलाश यांसारख्या ठिकाणी या कॅन्टीन उघडल्या आहेत. एकूण १०० कॅन्टीनमधून दररोज हजारो लोकांना फायदा होणार असल्याची माहिती देण्यात आलीय.

जेवणाची वेळ कधी?

या कॅन्टीन सकाळी ११ ते दुपारी ४ आणि सायंकाळी साडेसहा ते साडेनऊ या वेळेत सुरू असतील. प्रत्येक कॅन्टीनमध्ये दररोज सुमारे ५०० ते १००० लोकांना जेवण मिळू शकणार आहे. एकूण योजना पूर्ण झाल्यावर दररोज एक लाखाहून अधिक जेवण वाटले जाणार आहे. ज्यामुळे दिल्लीत भुकेची समस्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येतोय.

५ रुपयांत काय मिळणार?

अटल कॅन्टीन अंतर्गत फक्त ५ रुपयांमध्ये एक भरपेट थाळी मिळते. यात दोन चपात्या, मिक्स भाजी (सुक्या स्वरूपात), डाळ, भात आणि लोणचे यांचा समावेश आहे. जेवण साधे पण पौष्टिक असते, जे मजुरांना आणि गरीबांना ऊर्जा देणारी ठरणार असल्याचे सांगण्यात आलंय. सरकारकडून अनुदान दिले जात असल्याने ५ रुपये ही किंमत ठेवणं शक्य झालंय.

पारदर्शकता कशी राखणार?

कॅन्टीनमध्ये स्वच्छता आणि गुणवत्ता राखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. याअंतर्गत टोकन आणि बायोमेट्रिक पद्धतीने जेवण वाटप केले जाणार आहे. ज्यामुळे गैरव्यवहार टाळण्यास मदत होणार आहे. आधुनिक स्वयंपाकघर, एलपीजी आणि आरओ पाणी यांचीदेखील सोय करण्यात आली आहे. दिल्लीच्या निवडणूक जाहीरनाम्यात यासंदर्भात आश्वासन देण्यात आले होते.

सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांना सदनिकांचे वाटप ऑनलाइनच

स्वीकार-नकारासाठी ५ दिवसांचा अवधी, शासन निर्णय जारी

मुंबई। सरकारी अधिकारी व कर्मचारी यांना मुंबईतील सरकारी निवासस्थानांचे वाटप आता ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. सदनिका उपलब्ध झाल्याची माहिती अर्जदाराला प्राप्त होताच सदनिकेचा स्वीकार अथवा नको असल्यास पाच दिवसांत कळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील मुंबईतील शासकीय निवासस्थानांच्या वाटपाचे सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे. शासकीय



अधिकारी व कर्मचारी यांनी सदनिकेसाठी ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज भरायचे आहेत. त्यानुसार त्यांची नावे प्रतीक्षा यादीवर घेण्यात येतात तसेच प्रतीक्षा यादीनुसार सदनिका उपलब्ध झालेल्या अर्जदाराला शासकीय निवासस्थानाचे वाटप करण्यात येते.

ज्या अर्जदारांनी पोर्टलवर नोंदणी केली आहे आणि ज्यांना अद्याप मुंबईमध्ये कोणतीही सदनिका वाटप झालेली नाही, अशा अर्जदारांना रिक्त सदनिकेसाठी अर्ज करण्यासाठी एसएमएस पाठवण्यात येणार आहे, असे शासन निर्णयात नमूद केले आहे.

अशी असणार ऑनलाइन पद्धत

पोर्टल सुरू झाल्यापूर्वी ज्या अर्जदारांनी सदनिका वाटपासाठी लेखी स्वरुपात अर्ज सादर केले आहेत, अशा अर्जदारांनीसुद्धा पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक राहील. त्यांची वेटिंग लिस्ट सेनिऑरिटी कायम राहणार आहे. प्राधान्यक्रम भरण्यासाठी रिक्त असलेल्या सदनिकांची माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ई-मेल, एसएमएसने अर्जदाराला माहिती

अर्जदाराने आपल्या पात्रतेनुसार https://ggms.maharashtra.gov.in या पोर्टलवर किमान १ व कमाल १० प्राधान्यक्रम सादर करणे आवश्यक आहे. प्राधान्यक्रम भरण्यासाठी प्रत्येक महिन्यात २० दिवसांचा काही ठराविक कालावधी देण्यात येईल. त्या महिन्याच्या कालावधीच्या अंतिम दिनांकानंतर, सामान्य प्रशासन विभाग अर्जदाराने भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करण्यात येईल. प्रस्तावित सदनिका वाटपाची माहिती रटर/ऐं' द्वारे अर्जदाराला कळवली जाणार आहे. ज्या अर्जदारांनी प्रस्तावित सदनिका वाटप स्वीकारले आहे, त्यांचे प्रकरण सक्षम प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

अखेर नवी मुंबई विमानतळावरून विमानोड्डाणास प्रारंभ



नवी मुंबई। अखेर गेल्या अनेक वर्षांची प्रतीक्षा संपून पहिल्या विमानाने गुरुवारी 'टेक ऑफ' केल्यानंतर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानोड्डाणास सुरुवात झाली. या विमानतळावरून विमान सेवा सुरू झाल्याने नवी मुंबईकरांनी आनंद व्यक्त केला आहे.

या विमानतळाला केंद्र आणि राज्य शासनाने लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव अद्याप न दिल्याने गावोगावी निषेधही नोंदवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन झाले आहे. तेव्हापासून विविध चाचण्या आणि इतर सोपस्कार होऊन २५ डिसेंबर रोजी सकाळी ८.४० वाजता नवी मुंबईतून पहिल्या विमानाने हैदराबादच्या दिशेने उड्डाण केले. तत्पूर्वी नवी मुंबई

विमानतळावर इंडिगो एअरलाइन्सचे बंगळुरू येथून आलेले पहिले विमान सकाळी ८ वाजता लॅण्ड झाले. बंगळुरूहून आलेल्या इंडिगो विमानाचे धावपट्टीवर आगमन झाल्यावर पाण्याचे फवारे उडवून वॉटर जेट (पाण्याच्या तोफांची) सलामी देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर इंडिगोचे हेच विमान सकाळी ८.४० वाजता हैदराबादच्या दिशेने झेपावले. या विमानोड्डाणचा ऐतिहासिक क्षण आपल्या कॅमेऱ्यात आणि मोबाईलमध्ये बंदिस्त करण्यासाठी हजारो नागरिकांची पनवेल आणि उलवे परिसरात गर्दी दिसली.

पहिल्या दिवशी नवी मुंबई ते गोवा (मोपा), कोची, बंगळुरू, हैदराबाद, दिल्ली, अहमदाबादसाठी इंडिगो, अकासा एअर, एअर इंडिया एक्स्प्रेस, स्टार एअर या कंपन्यांनी विमानसेवा दिली. प्रारंभीच्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळ सकाळी ८ ते रात्री ८ या १२ तासांच्या कालावधीत कार्यरत राहणार आहे. दररोज २३ नियोजित उड्डाणे सुरू राहतील. यानंतर फेब्रुवारी २०२६ पासून विमानतळ २४ तास सुरू ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर आंतरराष्ट्रीय उड्डाणांनाही सुरुवात होणार आहे.

दुचाकी-कार अपघातानंतर भीषण आग



विरार। सातीवली पुलावर शुक्रवारी सायंकाळी कार आणि दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातानंतर दोन्ही वाहनांना भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. वसई फाटा उपअग्निशमन केंद्राच्या पथकाने वेळेवर घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणल्याने पुढील धोका टळला.या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. सायंकाळी सुमारे ६.०५ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. अपघातानंतर कार आणि दुचाकीला अचानक आग लागली. आग इतकी तीव्र होती की काही वेळातच दोन्ही वाहने पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. या घटनेची माहिती मिळताच वसई-विरार शहर महानगरपालिकेचे अग्निशमन वाहन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. तब्बल एक तासाच्या प्रयत्नानंतर आग युनियंत्रण मिळवण्यात अग्निशमन विभागाला यश आले. अग्निशमन दलाचे नेतृत्व पोलीस हवालदार रमेश रामचंद्र अमलदार यांनी केले. या कारवाईत वा.चा. द्वारकानाथ पाटील, अ.वि. राकेश सावंत, अ.वि. कल्पेश पाटील आणि अ.वि. दर्शन पाटील सहभागी होते. तसेच पोलीस कर्मचारी रमेश अमलदार, कमलाकर आणि सानप यांनी घटनास्थळी बंदोबस्त ठेवून वाहने ताब्यात घेतली. पोलिसांनी अपघाताची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.



पाणी टंचाईबाबत खासदार, आमदार आणि सीईओंची संयुक्त बैठक

मोखाडा। तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेबाबत गेल्या काही दिवसांपासून अनेक तक्रारी सुरू होत्या. याशिवाय विज बिल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने भरायचे की ग्रामपंचायतीने याबाबत देखील अनेक तांत्रिक अडचणी उभ्या राहिल्या होत्या. या सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांची सांगड जुळविणे आवश्यक होते. यातूनच पालघर लोकसभेचे खासदार हेमंत सवरा, विक्रमगड विधानसभेचे आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम यांच्याबरोबर पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तन्मय कांबळे, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुरूम या सर्व प्रमुख अधिकार्यांच्या उपस्थितीत तालुक्यातील सर्व सरपंच ग्रामसेवक तसेच जलजीवन योजनेतील सर्व ठेकेदार यांची एक एकत्रित बैठक मोखाडा तालुक्यात घेण्यात आली. मोखाडा तालुका पाणीटंचाईमुळे आजवर कुप्रसिद्ध होता. तो आता राज्यातील पाणीपुरवठा योजनेबाबत आदर्श तालुका होईल, असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला. मोखाडा तालुक्यासाठी पाणीपुरवठा योजना दोन भागात विभागलेली आहे. अप्पर वैतरणा येथून मोखाडा तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत विभागापर्यंत पाणीची टाकी बांधणे, अशी योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्यात आलेली आहे.

तर त्या टाकीपासून घरापर्यंतची नळ जोडणी ही जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून होणार आहे. सद्यस्थितीत जीवन प्राधिकरणाकडून फक्त तीन टाक्यांचे काम अपूर्ण असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय ५५ गावांपैकी ३५ गावांना पाणीही जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यानंतर कोणत्या गावात पाणी जाते, असा दावा प्रशासन करत होते. त्याला तात्काळ तेथील ग्रामसेवक आणि सरपंच यांच्याकडून तेथील सद्यस्थितीची माहिती घेण्यात आली. यावेळी अनेक ग्रामपंचायतींना पाणी जात असले तरी अनेक छोट्या-मोठ्या तक्रारी सुद्धा यावेळी सरपंच यांनी मांडल्या. यावर तात्काळ तोडगा काढण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.

गणवेशातील पोलिसाचे महिलेशी अश्लील चाळे

मुंबई सेंट्रल स्टेशनजवळील मैदानात प्रकार, नागरिकांचा चोप



मुंबई। मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाला लागूनच असलेल्या एका मैदानात वदीर्तील पोलिसाने गतीमंद महिलेसोबत अश्लील चाळे केल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. फेरफटका मारण्यासाठी आलेल्या नागरिकांनी पाहिले आणि या पोलिसाला चोप देत पोलिसांच्या हवाली केले. धक्कादायक म्हणजे मैदानाला लागूनच पोलिसांची चौकी आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करून ताडदेव पोलिसांनी सहायक फौजदाराला अटक केली.

नेमकं काय घडलं?

ताडदेव आरटीओकडे जाणाऱ्या साने गुरूजी मार्गावर महापालिकेचे भाऊसाहेब हिरे उद्यान आहे. लहान मुलांची खेळण्यासाठी आणि फेरफटका मारण्यासाठी नागरिक या ठिकाणी मोठ्या संख्येत असतात. सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास एक गणवेशातील पोलिस तरूणीसोबत बसल्याचे येथील नागरिकांनी पाहिले.

नागरिकांचा पोलिसाला चोप

काही वेळाने हा पोलिस तिच्यासोबत लगट करून अश्लील चाळे करू लागला. हा संतापजनक प्रकार पाहून नागरिक जमा झाले आणि पोलिसाला पकडून चोप दिला. पोलिस चौकी उद्यानाला लागूनच असल्याने याबाबतची माहीती कळताच ताडदेव पोलिस घटनास्थळी पोहोचले. नशेत असलेल्या या सहायक फौजदाराला ताब्यात घेत पोलिस ठाण्यात नेण्यात आले. या घटनेमुळे ताडदेव परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक चौकशीत ही तरूणी गतिमंद असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. सहायक फौजदार पोलिसांच्या सशस्त्र विभागात कार्यरत असून सध्या ल विभाग २ येथे नेमणूकीस आहे.

डोंगराळे खटल्याची २७ रोजी सुनावणी

दरम्यान, मालेगाव तालुक्यातील डोंगराळे अत्याचार प्रकरणात पोलिसांनी ४२५ पानांचे दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर दुसऱ्यांदा सोमवारी (दि. २२) येथील अपर जिल्हा सत्र न्यायालयाचे न्या. के. आर. पाटील यांच्यासमोर विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे युक्तिवाद केला. यावेळी न्यायालयीन कोठडीत असलेल्या संशयितासही व्हिडीओ कॉन्फरसद्वारे हजर करण्यात आले होते. या खटल्याची पुढील सुनावणी २७ डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहे. सोमवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी संशयिताच्या वकिलांनी पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या पुराव्यांची प्रत व डिजिटल पुरावे मिळावेत असा अर्ज केला. यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी पुढील सुनावणीच्या वेळी पुरावे व प्रत दिली जाईल, असा युक्तिवाद केला.

अशी झाली कारवाई

वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई विवेक देविदास पारासुर यांच्या पथकाने हे ऑपरेशन राबवले. हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री करण्यासाठी पोलिसांनी एका बनावट ग्राहकाचा (नितीन बावसकर) आधार घेतला. सरकारी सिक्रेट फंडातून मिळालेल्या २,००० रुपयांच्या नोटांसह बनावट ग्राहकाला लॉजमध्ये पाठवण्यात आले. व्यवहाराची पुष्टी होताच, पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी हॉटेलवर धाड टाकली.

धक्कादायक वास्तव आणि जप्ती

तपास पथकाने हॉटेलच्या पहिल्या माळ्यावरील रूम नंबर २०१ मध्ये प्रवेश केला असता, तेथे २६ आणि ३९ वर्षीय बांगलादेशी महिलांसह एकूण पाच महिला आढळल्या. पोलिसांनी घटनास्थळावरून गर्भनिरोधक साधने, रोकड, एसी, टीव्ही आणि इतर साहित्य जप्त केले. त्यानंतर दुसऱ्या माळ्यावरील रूम नंबर ३०१ ते ३०५ ची झडती घेतली असता, तेथे आणखी सहा महिला आढळल्या. यामध्ये एका १६ वर्षांच्या अल्पवयीन बांगलादेशी मुलीचा समावेश होता, जिचा वेश्याव्यवसायासाठी बळी दिला जात होता.

हॉटेलच्या नावाखाली मानवी तस्करीचा 'डर्टी गेम'

बांगलादेशी मुलीसह महिला... पोलिसांनी मालकासह तिघांच्या आवळल्या मुसक्या

नवी मुंबई। अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सोमवारी, २१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री 'हॉटेल नवनाथ इन लॉजिंग' येथे मोठी कारवाई करून बेकायदेशीर वेश्याव्यवसायाचा पदार्फाश केला. या छाप्यात एका १६ वर्षीय अल्पवयीन बांगलादेशी मुलीसह अनेक भारतीय आणि बांगलादेशी महिलांची सुटका करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून मानवी तस्करीचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.


आरोपींवर कठोर गुन्हे दाखल

या प्रकरणी हॉटेलचा मॅनेजर गिरीश



विठ्ठल शेट्टी, मालक वसंत गणेश शेट्टी आणि सर्व्हिस बॉय रोशन रामजित यादव यांच्याविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ (कलम १४३, ३), अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ आणि विशेषतः पोक्सो कायद्यांतर्गत कठोर कलमे लावली आहेत.

सुरक्षेचे आवाहन लॉजचे सीसीटीव्ही फुटेज, रजिस्टर आणि इतर कागदपत्रे पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. महिला आणि अल्पवयीन मुलींच्या शोषणाविरुद्ध हे मोठे पाऊल असल्याचे पोलीस प्रशासनाने म्हटले आहे. तसेच, नागरिकांनी अशा बेकायदेशीर कृत्यांबाबत सतर्क राहून पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.



मध्यरात्री हॉटेलमध्ये सुरु होता ४ जोडप्यांचा घाणेरडा खेळ, पोलिसांनी रेड टाकताच नको त्याच अवस्थेत आढळले

वेश्याव्यवसायात सहभागी असलेल्या ४ जोडप्यांना अटक

ही कारवाई आयजीएरएस पोर्टलवर एका व्यक्तीने दाखल केलेल्या तक्रारीवरून करण्यात आली. संपूर्ण प्रकरणाची माहिती देताना, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) चिराग जैन यांनी सांगितलं की, आयजीएसला मिळालेल्या तक्रारीवरूनच हा छापा टाकण्यात आला होता. वेश्याव्यवसायात सहभागी असलेल्या चार महिला आणि चार तरुणांना अटक करण्यात आली आहे.

मुंबई । उत्तर प्रदेशातील आझमगडमधील राधा नावाच्या सामान्य दिसणाऱ्या हॉटेलमध्ये घाणेरडे कृत्य सुरु होतं. चार जोडपी त्याच हॉटेलमध्ये होती. पण, त्यांना कसलीही भीती वाटत नव्हती. तेव्हा अचानकपणे एका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. परिस्थिती पाहून जोडप्यांनी घटनास्थळावरून पळ काढला होता. यामुळे घटनास्थळी एकच खळबळ उडाली होती. अटकेत असलेल्या आरोपींकडून पोलिसांनी साहित्य देखील जप्त केली आहेत. या अनैतिक कृत्यात सहभागी असलेल्या हॉटेल मालकाला देखील अटक करण्यात आली. अटक केलेल्या व्यक्तींकडून पोलिसांनी काही वस्तू जप्त केल्या आहेत. या अनैतिक कृत्यात सहभागी असलेल्या हॉटेल मालकालाही अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितलं. छापेमारीनंतर पोलिसांनी अनेक अलिशान वाहने, मोबाईल फोन आणि ओळखपत्रे देखील जप्त करण्यात आली आहेत. अटकेत असलेल्या सर्वांवरच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाची पुढील कारवाई सुरु ठेवण्यात आली आहे. पोलिसांनी सांगितलं की, या रेस्टॉरंटमध्ये बऱ्याच काळापासून अश्लील काम सुरु होतं. या घटनेबाबत त्यांनी अनेक तक्रारी दे खी ल केल्या होत्या.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com